## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ यांची साक्ष

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– विकास रघुनाथ जाधव,
**वय** :– ४४ वर्षे, **धंदा** :– नोकरी,पो.हे.कॉ.९१५
**राहणार** :– विटा, ता. खानापूर, जि. सांगली.
सद्या नेमणूक विटा पोलीस ठाणे

## सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्रीमती ए. पी. केसकर, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत

**०१.** मी आटपाडी पोलीस ठाण्यात सन २०१२ ते २०२३ या कालावधीत चालक या पदावर कार्यरत होतो. दिनांक २९/१०/२०२१ ते ३०/१०/२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजपर्यंत माझी चालक म्हणून डयूटी होती.

**०२.** रात्री २३.०० वाजता रात्रगस्तीच्या वेळी चेर्कींग अंमलदार म्हणून पो.कॉ./२६१४ जाधव, पो.कॉ./२१८६ लोखंडे असे आम्ही रात्र गस्तीकरीता सरकारी वाहन क्र एम.एच.१०.डी.एल.९२३० ने बाहेर पडलो होतो. रात्री १२.३० च्या सुमारास ठाणे अंमलदार यांचा पो.कॉ.लोखंडे यांना फोन आला की, ''दिघंची ते झरे जाणा–या रोडवर दत्त मंदीराजवळ एक वाळूचा डपंर आणि जेसीबी वाळू भरण्यासाठी उभा आहे''. सदर बातमी वरुन आम्ही बातमी मिळाल्याठिकाणी रवाना झालो.

**०३.** आम्ही त्याठिकाणी पोहोचलो असता आमची गाडी पाहून जेसीबी त्याठिकाणाहून निघून गेला. त्याठिकाणी पांढ–या रंगाचा विनाक्रमांकाचा डंपर उभा होता. त्यामध्ये ३ ब्रास वाळू होती. पो.कॉ.जाधव यांनी पंचांना बोलावून तो डंपर ताब्यात घेवून पोलीस ठाण्यात आणला. पो.कॉ.लोखंडे यांनी फिर्याद दिली. तपासीक अंमलदार यांनी माझा जबाब नोंदविला होता. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

## उलटतपास आरोपीतर्फे – श्री.सी.व्ही.जाधव विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु

**०४.** मी पोलिसांना जबाब देताना असे सांगितले होते की,''वाळू

भरण्यासाठी उभा आहे'', सदर बाब माझ्या जबाबात नमूद नसण्याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, अशी घटना घडली नसल्यामुळे मी सदर बाब पोलिसांना सांगितली नव्हती.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, रात्रगस्तीची वेळ ठरलेली असते. हे म्हणणे खरे नाही की, रात्रगस्तीचा मार्ग ठरलेला असतो. हे म्हणणे खरे आहे की, गस्त सुरू होण्याची आणि संपण्याची वेळही ठरलेली असते. हे म्हणणे खरे आहे की, रात्रगस्तीला कोणाची ड्यूटी आहे आणि कोणते वाहन आहे याबाबतची नोंद पोलीस ठाण्याच्या रजिष्टरला असते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस ठाण्यात सरकारी वाहनाचे हालचाल रजिष्टर म्हणजेच लॉगबुक असते. हे म्हणणे खरे आहे की, त्या लॉगबुकमध्ये कोठून कोठे गेलो, कोण–कोण गेलो, कोणत्या वाहनाने गेलो या नोंदी ठेवलेल्या असतात. हे म्हणणे खरे आहे की, लॉगबुकची कस्टडी चालकाकडे असते. असे घडले नाही की, तपासकामी तपासीक अंमलदारने माझ्याकडे लॉगबुकची मागणी केली किंवा मी पोलिसांना लॉगबुक दिले होते. असे घडले नाही की, मी तपासीक अंमलदार यांना लॉगबुकचा उतारा दिला होता. हे म्हणणे खरे आहे की तथाकथित तारखेला मी दिघंची–झरे रस्त्यावर गेलो होतो असा कागदोपत्री पुरावा आज न्यायालयात पाहायला मिळाला नाही.

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, दिघंची येथे पोलीस आऊटपोस्ट आहे. हे म्हणणे खरे आहे की, आऊटपोस्टला कर्मचा–यांची डयुटी नेमून दिलेली असते. असे घडले नाही की, आम्ही जाताना दिघंची आऊटपोस्ट कर्मचा–यांशी संपर्क साधला होता. हे म्हणणे खरे आहे की, दत्त मंदीर दिघंची ते आऊटपोस्ट हे अंतर ३ ते ४ कि.मी. असावे.

**०७.** तथाकथित डंपर आणि जेसीबीच्या मालकांची नावे मला माहिती नाही. जेसीबीचा वेग सर्वसाधारणपणे २० ते ३० ताशी कि.मी. असतो. हे म्हणणे खरे आहे की एखादा जे.सी.बी पोलीस गाडी समोरून निघून गेल्यास त्याचा पाठलाग करणे पोलीस गाडीला शक्य असते.

**०८.** हे म्हणणे खरे आहे की, पंच हे पोलीस ठाण्याचे नेहमीचे पंच आहेत. हे मला माहित नाही की या कामात किती पंचनामे झाले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, बाळू पाटील आणि रणदिवे हे देखील पोलीस ठाण्याचे नेहमीचे पंच आहेत.

**०९.** हे म्हणणे खरे आहे की, अपरात्री एखादी माहिती मिळाल्यास त्याची नोंद पोलीस ठाण्यात केली जाते. हे मला माहित नाही की, पोलीस ठाण्याला बातमी मिळाल्याची नोंद पोलीस ठाण्यात घेतली होती कि नाही याची मला व्यक्तीशः माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला पूर्वीपासून ओळखतो अशी परिस्थिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रकाश पुजारी हा सराईत गुन्हेगार आहे अशी परिस्थिती नाही.

**१०.** हे म्हणणे खरे नाही की आम्ही गस्त घालत असताना बातमीनुसार घटनास्थळी पोहोचल्यानंतर एक पांढ'या रंगाचा डंपर मिळून आला ज्यामध्ये अवैध वाळू होती व ते डंपर पोलीस ठाण्यात आणून पंचनामा केला व फिर्याद दाखल केली असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस ठाण्यात अवैध वाळू, दारू, मटका, जुगार इत्यादीचे खटले दाखल करण्यासंदर्भात वरिष्ठांचा तगादा असतो. हे म्हणणे खरे नाही की सदर कोटा भरून काढण्यासाठी आम्ही अशाप्रकारचे खोटे गुन्हे दाखल करत असतो. हे म्हणणे खरे नाही की मी सरतपासात कथन केलयाप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.
**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

समक्ष

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.12.09 13:35:24 +0530

दि.०९/१२/२०२५
ठिकाणः आटपाडी.

**(आर. बी. कुलकर्णी)**
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी